Rotary | SERVE TO CHANGE LIVES



# southern star ...अवघे धरू सुपंथ

**Official Bulletin Of The Rotary Club Of Pune South**


Year: 52 Vol: 03 September 2021

President: Rtn. Atul Atre

Secretary: Rtn. Krishnakiran Velankar

Editor: Rtn. Abhijit Deshpande



# Concept of Satellite Club

**PP Rtn. Virendra Shah**

Rotary international came out with the concept of SATELLITE CLUB for the main purpose of increasing Membership numbers along with numbers of clubs across the globe and also by adding members of varied classifications.

It's the most successful way of incubating and inculcating Rotary philosophy and fundament.

Initially the main club sponsors the SATELLITE CLUB and the name is identical with the sponsor club with some additional name/phrase e.g. GOLD, LITERATURE.

To start a SATELLITE CLUB at least 8 members are need to be inducted in the SATELLITE CLUB with all the processes, culture and functional methods of Rotary international under the mentorship of the sponsor club.

As a member of the said SATELLITE CLUB each member has to pay at least the annual dues subscription to RI (Rotary international) through the sponsor club.

It enjoys all independence of selecting its own office bearers like chairperson, chairperson elect (vice chairperson) club secretary, treasurer, directors and all the working pattern like the sponsor club including selection of meeting day, time, venue, choice of meeting online or in person every week. As a result it attracts many members from not only the same town but even members staying at different locations from all over the globe.

SATELLITE CLUB can be continued as a part of sponsor club for 3 years in continuation till it becomes an independent entity as a full fledged Rotary club.

While becoming an independent club, naturally the sponsor club resigns as a sponsor club and the SATELLITE CLUB with RI approval gets its charter.

SATELLITE CLUB can have their own independent financial account, annual fee structure with minimum compulsion of annual dues as per RI norms .

Even though being a separate entity, members are described as a Rotarian of the sponsor club and enjoy liberty of participation in all activities of the sponsor club besides their own Satellite CLUB membership, except voting rights in the sponsor club.

Our RCPS can have more numbers of SATELLITE CLUBS. We are planning to have one or two more besides the two SATELLITE CLUBS we have already formed viz. RSCPS GOLD and RSCPS LITERATURE.

The whole purpose behind the SATELLITE CLUB formation by RI is to increase membership along with numbers of clubs.

## THE SPONSOR OF A NEW MEMBER

The by laws of Rotary clearly outline the procedure for a prospective member to be proposed for Rotary club membership. The "proposer" is the key person in the growth and advancement of Rotary. Without a sponsor, an individual will never have the opportunity to become a Rotarian. The task of the proposer should not end merely by submitting a name to the club secretary or membership committee. Rotary has not established formal responsibilities for proposers or sponsors; however, by custom and tradition these procedures are recommended in many clubs. The sponsor should:

Invite a prospective member to several meetings prior to proposing the individual for membership.
Accompany the prospective new member to one or more orientation/informational meetings.
Introduce the new member to other club members each week for the first month.
Invite the new member to accompany the sponsor to neighboring clubs for the first make-up meeting to learn the process and observe the spirit of fellowship.
Ask the new member and spouse to accompany the sponsor to the club's social activities, dinners or other special occasions.
Urge the new member and spouse to attend the district conference with the sponsor.
Serve as a special friend to assure that the new member becomes an active Rotarian. When the proposer follows these guidelines, Rotary becomes stronger with each new member

# KALEIDOSCOPE



## ठोकताळ्यांचे गणित

**रो. आनंद कुलकर्णी (AK)**

आयुष्यात आपण काही ठोकताळे बांधलेले असतात, काही अंदाज बांधलेले असतात आणि त्यांचा बरेचदा आपल्याला उपयोग सुद्धा होतो. उदाहरणच द्यायचं झालं तर अमुक-तमुक आडनावाची व्यक्ती म्हणजे अशीच असणार किंवा एखादी व्यक्ती कोल्हापूरची आहे म्हणजे खूप तिखट खात असणार वगैरे वगैरे. जेव्हा तुम्ही क्लब जॉईन केला होता तेव्हा सुरूवातीचे दिवस आठवा. प्रत्येक नवीन व्यक्तीशी ओळख झाल्यावर त्या व्यक्तीच्या व्यवसाय, पेहराव, आडनाव यांच्यावरून आपण मनातल्या मनात त्या व्यक्तीविषयी नकळतच काही अंदाज बांधलेले असणार. त्यातील बरेच अंदाज खरे निघाले असतील तर काही चुकले असतील.

आता साध्या साध्या गोष्टीत हे अंदाज वापरले तर बरेचदा फायदाच होतो पण जेव्हा आयुष्यातले लग्न किंवा इतर मोठे निर्णय अशा अंदाजावरती आधारित घेतले जातात तेव्हा नुकसान होण्याची शक्यता असते आणि तशीच काही उदाहरणे काही केसेसमध्ये मला जवळून पाहायला मिळाली .

आपल्याकडे असे म्हणतात की मुलगी गरिबाघरची करावी. तिला पैशाची किंमत, कष्टाची सवय, ॲडजस्ट करण्याची सवय असते वगैरे. याच विचारांवरती आधारित एकांनी खूप गरीब घरातल्या मुलीशी लग्न केलं, पण लग्न झाल्यानंतर जाणवलं की ती प्रचंड आळशी आणि भांडकुदळ आहे. काहीही न करता दिवसभर टीव्ही बघत राहणे आणि मोबाईल वापरणे एवढीच तिची आवड होती आणि शेवटी सोडचिठ्ठी घेण्याची वेळ आली. दुसऱ्या एका केसमध्ये मुलाकडच्या जॉइंट फॅमिलीत ॲडजस्ट व्हावी म्हणून ऑलरेडी जॉइंट फॅमिलीतुन आलेली मुलगी बघितली, पण तिने नवरा सोडून इतर कोणाशीच ॲडजस्ट केले नाही. तर तिसऱ्या केसमध्ये मुलगा गेले बरेच वर्ष परदेशात आहे म्हणजे निश्चीतच प्रगत विचारांचा असणार अशा अंदाजावर लग्न केले आणि तो मुलगा समयोचित नसलेल्या रूढी मध्ये पार बुडून गेलेला, प्रत्येक छोट्या गोष्टी साठी भारतात असलेल्या आई-वडिलांच्या सल्ल्यावरती अवलंबून असलेला आणि स्वतंत्र विचार नसलेला असा निघाला.

एकदा प्रॉब्लेम झाल्यानंतर "आम्हाला तर वाटलं होतं...." या वाक्याला फारसा अर्थ राहत नाही, कारण पुढचा त्रास तर होतोच. व्यवसायातील मोठे व्यवहार, जागेचे व्यवहार, लग्न ठरवणे अशा वेळेस समोरच्या व्यक्तीविषयी कुठलेही अंदाज न बांधता स्वतः पूर्ण शहानिशा करून निर्णय घेणे हे कधीही उत्तम. तुमच्याही पाहण्यात अशा प्रकारचा कुठला प्रसंग आला असेल तर मला ऐकायला आवडेल, जरूर कळवा.

तसेच याउलट मर्यादित माहितीवर अंदाज बांधून कोणाविषयी निगेटिव्ह मत करून घेणे पण योग्य नाही. क्लबमध्ये जेव्हा नवीन मेम्बर्स ॲड होत आहेत तेव्हा ही जागरुकता ठेवणे कधीही चांगले.




## FUNCTIONAL LITERACY PROGRAM

**Literacy education was considered a program of priority by Rotary's original Health, Hunger and Humanity Committee in 1978. An early 3-H grant led to the preparation of an excellent source book on the issues of literacy in the world. The Rotary-sponsored publication, The Right to Read, was edited by Rotarian Eve Malmquist, a past district governor from Linkoping, Sweden, and a recognized authority on reading and educational research. The book was the forerunner of a major Rotary program emphasis on literacy promotion. In 1985 the R.I. Planning and Research Committee proposed, and the R.I. board approved, that the Rotary clubs of the world conduct a ten-year emphasis on literacy education. Many Rotary clubs are thoughtfully surveying the needs of their community for literacy training. Some clubs provide basic books for teaching reading. Others establish and support reading and language clinics, provide volunteer tutorial assistance and purchase reading materials. Rotarians can play a vitally important part in their community and in developing countries by promoting projects to open opportunities, which come from the ability to read**




# रक्तदान शिबिर

## ३१ जुलै २०२१

शनिवार ३१ जुलै सकाळी १० ते १  या वेळात आपण आपले रक्तदान  शिबीर आयोजित केले होते. या शिबिराला चांगला प्रतिसाद मिळाला. ७६ लोक रक्तदान करण्याकरता आले होते. २१ बाटल्या रक्त मिळाले. आपल्या क्लब कडून अध्यक्ष रो. अतुल, रो. विनायक जोशी, सुभाष करंदीकर , रो. नितीन कुरले, ॲनेट यश पोंक्षे, ॲन नेहा वाळिंबे व सनत परांजपे यांनी रक्तदान केले.  डायरेक्टर पी.पी. रो. विनायक देशपांडे व पी.पी. रो. सोनल पटवर्धन यांनी कार्यक्रमाचे नियोजन उत्तम केले. पी.पी. रो. डॉ. राजेंद्र गोसावी यांनी बरीच मदत केली. कार्यक्रमाचा हॉल रो. श्रीकृष्ण चितळे यांनी उपलब्ध करून दिला होता. पी. ई. रो. संजीव ओगले यांनी व्यवस्थापन पाहिले व बरीच मदत केली. तसेच जन कल्याण रक्तपेढीचे डॉक्टर व मदतनीस यांनासुद्धा मनःपूर्वक धन्यवाद. आपल्या क्लब तर्फे अनेक सदस्य उपस्थित होते. पी.पी. रो. डॉ. गोरे सर, रो. हेमंत वाळिंबे, रो. योगेश नांदुरकर, रो. किरण वेलणकर, पी.पी. रो. वीरेंद्र शहा, रो. डॉ. संगीता देशपांडे, ॲन यामिनी पोंक्षे, पी.पी. रो. श्याम कुलकर्णी, रो. भाऊ सहस्त्रबुद्धे, रो. अरविंद शिराळकर, रो. दत्ता पाषाणकर, ॲन अनुश्री गोसावी, रो. जितेंद्र महाजन, रो. रवींद्र प्रभूणे हे उपस्थित होते. आपल्या दोन्हीही रोटरॅक्ट क्लबच्या अध्यक्ष दिव्या व राशी या दोघीही उपस्थित होत्या.



# वृक्षारोपण कर्नल वाडी

## ४ ऑगस्ट २०२१

४ ऑगस्ट रोजी सकाळी आपण कर्नलवाडी येथे वृक्षारोपण केले. सर्वप्रथम सकाळी ८ वाजता निघून कर्नलवाडी येथे सर्व सभासद पोचले. आपण तिथे लावण्याकरता ३५६ झाडे दिलेली आहेत त्यापैकी आपण ५८ झाडे लावली. उरलेली झाडे ग्रामस्थ लावणार आहेत. तिथले सरपंच श्री निगडे हे उच्च शिक्षित व उद्योजक आहेत. त्यांनी सर्वांबरोबर वृक्षारोपण केले व नंतर सर्वांना न्याहारी दिली. तिथून त्यांचे पाॅली हाऊस बघण्याकरता सर्व सदस्य गेले. तिथे शास्त्रीय पद्धतीने कार्नेशन फुलांची लागवड करण्यात येते. ही फुले स्पेन मध्ये येतात. त्यांची मुलगी स्वतः ते बघते. तसेच त्यांनी अप्रतिम डाळिंबाची बाग केलेली आहे. त्यांचे वडील सुद्धा हे सर्व पुढाकार घेऊन बघतात. दुपारचे जेवण सर्वांनी सासवडला घेतले. गरम पोळ्या, पिठलं व चविष्ट मटकीची उसळ असे जेवण होते. या कार्यक्रमाची सर्व व्यवस्था पी.एन. रो. रवींद्र प्रभुणे व पी.पी. रो. डॉ. गोरे सर यांनी केली होती. आपल्याकडून प्रेसिडेंट रो. अतुल अत्रे, फर्स्ट लेडी नंदिनी, ॲन इंद्रायणी पूर्णपात्रे, कमिटी चेअर पर्सन रो. नितीन कुरले, पी.पी. रो. विनायक देशपांडे, रो. मिलिंद क्षीरसागर, पी. ई. रो. संजीव ओगले, सेक्रेटरी रो. किरण वेलणकर, पी.एन. रो. रवींद्र प्रभुणे व पी.पी. रो.डॉ. गोरे सर यांनी भाग घेतला.



# वृक्षारोपण चांबळी

## ८ ऑगस्ट २०२१

८ ऑगस्ट रोजी आपण चांबळी येथे वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित केले होता. रविवार असल्यामुळे सभासद मोठ्या संख्येनं उपस्थित होते. मुख्य म्हणजे आपले ६ रोटरॅक्टर्स उपस्थित होते. या सर्वांनी अत्यंत उत्साहानं पुढाकार घेऊन झाडं लावली त्यामुळे आपण ४०० झाडं लावण्याचा टप्पा पार पाडला.

रोट्रॅक्टर काजोल व रोट्रॅक्टर विशाखा शहा, रोट्रॅक्टर प्रतीक्षा पाटील, रोट्रॅक्टर प्रतीक्षा गोखले, रोट्रॅक्टर विभा ओसवाल या आल्या होत्या तर रोट्रॅक्टर सैफ अन्सारी हा आपले उत्साही पी. ई. रो. संजीव ओगले यांच्याबरोबर मोटरसायकलवरून आला होता. सकाळी सर्व जण ८ वाजता निघाले. बोपदेव घाट ओलांडल्यावर गरमगरम मिसळ, चविष्ट भजी आणि चहा असा नाश्ता करून सर्व जण चांबळी इथे पोहोचले.

पी. एन. रो. रवींद्र प्रभुणे आणि पी. पी. रो. डॉ. गोरे सर यांनी वनविभागाकडून ५०० रोपांची व्यवस्था केलेली होती. पाणी पंचायतच्या डॉ. सोनाली शिंदे व श्री प्रशांत सर यांनी पाणी पंचायत व चांबळी येथील कामाबद्दल माहिती दिली. वृक्षारोपण झाल्यानंतर पुलाव, कोशिंबीर असं स्वादिष्ट जेवण होतं.

असा सुंदर कार्यक्रम आटोपून दुपारी ३ वाजेपर्यंत सर्व जण घरी परतले. आपल्याकडून पी.पी. रो. डॉ. राजेंद्र व ॲन डॉ. अनुश्री गोसावी, पी. एन. रो. रवींद्र व सुनीता प्रभुणे, असिस्टंट गव्हर्नर रो. संदीप विळेकर, रोटरॅक्ट चेअर पर्सन रो. राघवेंद्र पोंक्षे, रो. मिलिंद व गौरी क्षीरसागर, रो. अभिजित देशपांडे, रो. योगेश नांदुरकर, रो. नितीन व ॲन स्वराली कुरले, फर्स्ट लेडी नंदिनी, पी. ई. रो. संजीव ओगले, पी.पी. रो. विनायक देशपांडे, रो. सुभाष चौथाई हे उपस्थित होते. रोटरॅक्टर्सच्या उत्साहामुळे कार्यक्रमात चैतन्य सळसळत होतं.

पी. एन. रो. रवींद्र प्रभुणे यांनी कार्यक्रमाचं नियोजन सुरेख केलं होतं.



# Aids Patient Rehabilitation

## 10th August 2021

**As per long term project of our Club, monthly grocery was distributed to the beneficiaries by Aids Patient Rehabilitation Committee headed by Rtn. Arvind Mawlankar on 10th August 2021.**



# रोटरी सॅटेलाईट क्लब ऑफ पुणे साऊथ लिटरेचर

## २९ जुलै २०२१

**आपण या वर्षातील आपला दुसरा सॅटेलाईट क्लब "रोटरी सॅटेलाईट क्लब ऑफ पुणे साऊथ लिटरेचर" स्थापन केला. या क्लब मधील सदस्य हे साहित्य क्षेत्राशी निगडित आहेत व त्या क्षेत्राच्या माध्यमातून समाजकार्य कारण्यातचे त्यांचे नियोजन आहे. या क्लब च्या स्थापनेत पुढाकार घेतल्याबद्दल अवेन्यू डायरेक्टर रो. योगेश नांदुरकर यांचे विशेष कौतुक व नवीन क्लब मधील सर्व सभासदांचे पुणे साऊथ परिवारात स्वागत. या क्लब मधील सदस्यांनी २९ जुलै रोजी डी.जी. रो. पंकज शाह यांच्याकडे क्लब स्थापनेचा अर्ज दाखल केला.**




रो. प्रचिती तलाठी, रो. तृप्ती कुलकर्णी, रो. उल्का पासलकर, डी.जी. रो. पंकज शाह
रो. प्राजक्ता कोळपकर, रो. नेहा लिमये, रो. कादंबरी सहस्रबुद्धे

# Satellite Club Joint Meeting

## 3rd August 2021

आज रोटरी सॅटेलाइट क्लब ऑफ पुणे साऊथ गोल्ड आणि रोटरी सॅटेलाइट क्लब ऑफ पुणे साऊथ लिटरेचर या दोन्ही क्लब्जची एकत्र मिटिंग झाली. यानिमित्तानं दोन्ही क्लब्जच्या सदस्यांची एकमेकांशी ओळख झाली. अर्थात पालक म्हणून रोटरी सॅटेलाईट क्लब ऑफ पुणे साऊथचे प्रे.रो. अतुल अत्रे यांनी ही कल्पना मांडली आणि निमित्त होतं डॉ. अथर्व डोळे यांच्या व्यायाम या क्लिनिकला भेट देऊन त्यांची संकल्पना समजून घेण्याचं.

रोटरी सॅटेलाईट क्लब ऑफ पुणे साऊथ गोल्डचे चेअर रो. ओमकार जोशी यांनी इ-वेस्ट जमा करून त्याची योग्य विल्हेवाट लावण्याच्या क्लबच्या प्रकल्पाबद्दल सांगितलं. या प्रकल्पाबद्दल ऐकताना हा क्लब नकळत पर्यावरणाबद्दल समाजात जागरूकता निर्माण करत असल्याचं जाणवलं.

आमच्या लिटरेचर सॅटेलाईट क्लबनं तर पहिला प्रोजेक्ट पूर्ण होतानाच 'ग्रंथालयांना पुस्तकभेट' हा नवीन प्रकल्प जाहीर करून दर महिन्याला किमान एका वाचनालयाला पुस्तकं देणार असल्याचं सांगितलं म्हणजेच आता अधिकाधिक पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचणार याची खात्री झाली.

रोटरी क्लब ऑफ पुणे साऊथ या पॅरेंट क्लबचे मेंबरशीप डायरेक्टर रो. योगेश नांदुरकर, गोल्ड सॅटेलाईट क्लबचे मेंटॉर वीरेन्द्र शहा, क्लब एक्स्टेंशन कमिटी चेअरपर्सन रो. अभिजित देशपांडे, डॉ. अथर्व डोळे यांचे वडील डॉ. संजीव डोळे आणि काका डॉ. संदीप डोळे हे कार्यक्रमाला उपस्थित होते. लिटरेचर क्लबचे मेंटॉर योगेंद्र नातू यांनी हा कार्यक्रम झुमवरून ऑनलाईन अटेंड केला.

आजच्या या एकत्र मिटिंगनंतर एकच वाक्य डोक्यात घोळतय 'All for one, one for all.'

-रो. प्रचिती तलाठी-गांधी, सॅटेलाइट लिटरेचर क्लब

It was joint meeting of Satellite Club of Pune South Gold and Satellite Club of Pune South Literature.

The idea was initiated by Rtn Atul Atre - President RCP South.

The occasion was Dr. Atharva Dole's new venture "Vyaiam" - exercise for disease.

Satellite Club Gold, Chair Rtn. Onkar Joshi has explained need of E-Waste collection and awareness in the society to save nature.

This is upcoming project on which team is working on.

This was wonderful opportunity to meet with members of Satellite Club of Pune South Literature members as well.

Literature Club Chair Rtn. Ulka Pasalkar explained their project about donating books to libraries.


Important part was they have already executed 1st project as well.

On this occasion Membership Director Rtn. Yogesh Nandurkar, Satellite Club Mentor PP Rtn. Virendra Shah, Club Extension Committee Chairperson Rtn. Abhijit Deshpande and Dr. Atharva's father Dr. Sanjeev Dole and uncle Dr. Sandeep Dole were present


-Rtn. Onkar Joshi, Chair Satellite Gold Club



Rtn. Ulka Pasalkar, Pres. Rtn. Atul Atre, Dr.Atharva Dole, Rtn. Onkar Joshi



PP Rtn. Virendra Shah, Rtn. Abhijit Deshpande, Rtn. Yogesh Nandurkar, Rtn. Aditi kirpekar, Prachiti Talathi



Rtn. Prajakta Kolapkar, President Rtn. Atul Atre, Rtn. Onkar Joshi



Dr. Atharva Dole, Dr. Sandeep Dole, Dr. Sanjeev Dole, PP Rtn. Virendra Shah

# RSCPS Gold E-Waste Collection Drive

## 15th August 2021

**On the occasion of Independence Day, Rotary Satellite Club of Pune South Gold conducted a successful E-Waste Collection drive at 24K Glitterati Society, Pimpale Nilakh. Rtn. Yogesh Nandurkar, Rtn. Abhijit Deshpande, Rtn. Raghavendra Ponkshe, Rtn. Madhuri Kirpekar, Spouse Subhash Karandikar and PP Rtn. Dr. Sudhanshu Gore from RCPS were present to boost our first project.**

**Gold Satellite Club Chairperson Rtn. Onkar Joshi, Secretary Rtn. Aditi Kirpekar and members Rtn. Akshay Kirpekar, Rtn. Anushree Athalye and Rtn. Gaurav Agrawal were present and conducted this drive successfully.**

**Rotaract Club of Poona South President Rtr. Rashi and members Rtr Om, Rtr. Ninad, Rtr. Ramya and Rtr. Chinmay were present and took part in the initiative.**

**Thanks to 24K Glitterati society and their Chairman Mr. Kulkarni for letting us conduct this drive.**

**Special thanks to Mr. Mandar Walke from Tes-Amm recyclers for helping us collect this e-waste and sharing his knowledge of the same.**









# Installation of Interact Clubs


## 23rd August 2021

**Installation of our two Interact Clubs at Nutan Balvikas Mandir, Sadashiv Peth, Pune and Samajbhushan BaburaoPhule Madhyamik Vidyalaya, Parvati, Pune was held online on 23rd August 2021. Chairperson of our Literature Satellite Club Rtn. Ulka Pasalkar presided over the meeting as Chief Guest. Ann Rucha Nandurkar welcomed the dignitaries and guests. The event was attended in large numbers by Interact Club members, students, teachers and RCPS members. Ann Madhavi Deshpande extended the vote of thanks on behalf of the club.**


**An eco-friendly Ganpati making competition was also declared for the students on this occasion.**

**The program was well organized by Avenue Director Rtn. Hemant Walimbe and Interact Committee Chair Rtn. Madhuri Kirpekar.**














# वैद्यकाचा बाजार-डॉ. श्रीराम गीत

२ ऑगस्ट २०२१

**ॲन विनिता कुलकर्णी**

आपल्या क्लबच्या २ ऑगस्टच्या मीटिंगला प्रमुख पाहुणे होते डॉ . श्रीराम गीत आणि त्यांचा विषय होता "वैद्यकीय बाजार!". सध्याच्या काही वर्षात वैद्यकीय क्षेत्रात झालेले प्रचंड बदल आणि खरी परिस्थिती ह्या अनुषंगाने त्यांनी त्यांचे उदबोधक विचार मांडले. पी पी .रो . शाम कुलकर्णी ह्यांनी डॉ . गीत ह्यांची ओळख करून दिली.

सुरवातीच्या काळात डॉक्टरांनी ३० वर्षे फॅमिली फिजीशियन म्हणून काम केले. नंतर सुमारे १२ वर्ष त्यांनी संजीवन हॉस्पिटलच्या व्यवस्थापनेत काम केले. त्याच दरम्यान त्यांनी 'डॉक्टरच व्हायचे मला, ग्राहक संरक्षण कायदा, अद्भुत शरीर, शाकाहाराच का, ज्येष्ठांचा सोबती' ही पुस्तके लिहिली. इ.स. २०१३ साली त्यांचे "वैद्यकीय बाजार" हे पुस्तक प्रकाशित झाले आणि पुढे ह्याच विषययावर त्यांनी वसंत व्याख्यान मालेत पुणे, सोलापूर, पार्ले, येथे व्याखाने दिली. दैनिक वर्तमानपत्रात त्यांचे अनेक लेख प्रकाशित झाले.

आपल्या भाषणात त्यांनी निदर्शनास आणून दिले की पूर्वी आपल्याकडे एकत्र कुटुंब पद्धती, घरात एकमेकास आधार देण्यास व्यक्ती होत्या. प्राथमिक घरगुती उपचार, फॅमिली फिजिशियन असे रूढ होते. परंतु २००० सालानंतर वैद्यकीय क्षेत्रात एकदम अमुलाग्र बदल घडून आले. जनरल प्रक्टीशनर्स प्रकार कमी होऊन कन्सल्टंट्स वाढले. एकत्र कुटुंबे विखुरली, त्यामुळे सामान्य जनतेची हॉस्पिटलची धाव वाढली. डायग्नोस्टिक संटर्सची वाढ झाली. मोठाली हॉस्पिटल्स उदयाला आली. तिथे परदेशातून आयात केलेली महागडी मशिनरी बसवण्यात आली. आयटी क्षेत्रे प्रचंड फोफावली. विविध कंपन्यांचे विविध हॉस्पिटल बरोबर tie -ups सुरू झाले. हॉस्पिटलचा वाढता खर्च आणि कंपन्यांनी घेतलेली आर्थिक जबाबदारी यामुळे हॉस्पिटलची बिले भरमसाठ वाढू लागली. या सगळ्या बदलात डॉक्टर्स हतबद्ध झाले आणि हरवून गेले. महागडी औषधे, वाढत्या महागड्या टेस्ट्स, hospitalisation या दुष्ट चक्रात पेशंट अडकले. बघता बघता वैद्यकीय बाजार वाढला. ह्यात भरीस भर गेल्यावर्षी मार्चपासून सर्वांवर आलेले करोनाचे संकट! घाबरलेला सामान्य माणूस आणखीनच वेगवेगळ्या टेस्ट आणि औषधे यात अडकला. वेगवेगळ्या कंपन्यांची लस निर्मितीसाठी चुरस सुरू झाली. त्यामुळे लोक अजूनच गोंधळे. अश्या ह्या वैद्यकीय चक्राला सामोरे जाताना भीती कमी करून 'डोळस' पणे वैद्यकीय उपचार करून घ्या असा मौलिक सल्ला डॉक्टर श्रीराम गीत ह्यांनी दिला.

रो. योगेश नांदुरकर ह्यांनी आभारप्रदर्शनात, डॉ. गीत ह्यांचे विचार अंतर्मुख करणारे आणि जनजागरणही करणारे आहेत असे सांगितले.

Watch Video



# सुरमयी शाम - अर्चना साने
## ९ ऑगस्ट २०२१
### रो. डॉ. संगीता देशपांडे

श्रावण मासाची सुंदर सुरुवात एका बहारदार मैफिलीने झाली. 'सुरमयी शाम' सदारकर्त्या होत्या आकाशवाणीच्या निवेदिका अर्चना साने . प्रथम एस डी बर्मनजींची सदाबहार, अवीट गोडीची गाणी त्यांच्या वैशिष्ट्यांसह ऐकली आणि पाहिली. एका मान डोलावणाऱ्या मेलडी ची सुरुवात ' फैली हुई है' या गाण्याने झाली. बर्मन यांच्या गाण्याचे वैशिष्ट्य असे की त्यांची गाणी काही शास्त्रीय, तर काही संवाद साधणारे बोल असलेली, तर काही बंगाली रबिंद्र संगीताचा गोडवा असलेली. देवानंद यांच्या बहुतेक सिनेमातली गाणी त्यांनी स्वरबद्ध केली .

आपण कार्यक्रमात तकदीर से बिगडी हुई, तेरे घर के सामने, छोड दो आचल, जाने क्या तुने कही , मोसे छल किये जाय -- ही गाणी ऐकली. गाण्याचे शब्द आणि भावाप्रमाणे ते गायक निवडत असत.


ओ पी नय्यर यांच्या सांगितिक कारकिर्दीची सुरुवात वयाच्या अठराव्या वर्षी झाली. प्रीतम आन मिलो हे त्यांचे पहिले गाणं ते खूपच गाजले. अर्थात त्यांची सर्वच गाणी खूप गाजली. त्यांच्या गाण्याची खासियत म्हणजे कट नोट्स स्टाइल. उदाहरणार्थ बाबूजी धीरे चलना, वो हसीन दर्द दे दो, आखो आखो मे.

मधुबाला ही लाडकी नटी. तिच्या सहा चित्रपटांना त्यांनी संगीत दिले. ‘आईये मेहरबान’ हे sensous गाणं अजूनही तितक्याच आवडीने ऐकले जाते. ओ पी नय्यर साहेब खूप शिस्तबद्ध होते. एकदा रेकॉर्डिंगचे वेळी ताल वाद्य वादकांना यायला उशीर झाला तर त्यांनी तबला आणि तालवाद्या शिवाय गाणे रेकॉर्ड केल. ते गाणे - मै प्यार का राही हू.

शम्मी कपूरची बहुतेक गाणी ओपी साहेबांनी स्वरबद्ध केली. उदा. दिवाना हुआ बादल. त्यांची स्पेशालिटी टांगा गीतांची. ये क्या कर डाला तुने, यू तो हमने लाख हसी देखी है, मांग के साथ तुम्हारा, बंदा परवर थाम लो जिगर या गाण्यांनी कार्यक्रमाची सांगता झाली . आशाताईंचे "चैन से हमको कभी" या गाण्याने डोळे पाणावले.

ॲन स्वाती वेलणकर यांनी सर्वांच्या वतीने आभार प्रदर्शन केले. सभासदांचा व पाहुण्यांचा मोठ्या प्रमाणात सहभाग होता.







# मी ही एक दुर्गा - स्वाती शिंगाडे

१६ ऑगस्ट २०२१

अॅन चारुशीला पटवर्धन

या वर्षी प्रोग्राम कमिटीने "मी ही एक दुर्गा " असा आगळा वेगळा कार्यक्रम घ्यायचे ठरविले त्यातील पहिला कार्यक्रम असल्याने सर्वांना उत्सुकता होती कोण आहे पहिली दुर्गा.

बारामती जवळील पुण्यापासून 125 किलोमीटर वरील पंदरे या छोटया गावातील एक हुशार तरुणी. शेतीची पदवी (M. Sc.) संपादन केल्यावर एमपीएससी पास करून पोलीस इन्स्पेक्टर म्हणून रुजू झालेल्या या तरुणीला मात्र आवडीचे वेगळे क्षेत्र साद घालत होते. सरकारी नोकरीत उज्वल भविष्य दिसत असूनही अनिश्चित वेगळी वाट धरण्याचे धारिष्ट सौ.स्वाती शिंगाडे यांनी दाखविले त्यातून त्यांचा आत्मविश्वास दिसून येतो. तो किती सार्थ होता याची प्रचिती त्यांनी केलेल्या अनुभव कथनातून आज आली.

कोरडवाहू जमिन, बेभरवाश्याचा पाऊस, कर्जाला नकार अश्या अडचणींना तोंड देत माळ रानावर हिरवळ फुलविली. आधुनिक तंत्रज्ञान वापरून फुलशेती, बाजाराचा अभ्यास करून विक्री, हिशोब ठेवणे यामुळे दोन वर्षातच कर्ज मुक्त होऊन नवनवीन प्रयोग आणि उपक्रम सुरु केले. सेंद्रिय शेती, ब्रँड स्थापित करणे, प्रक्रिया करून मूल्यवर्धन, अग्रो टुरिझम, देशी गायी दुग्धपादन असे एक एक क्षेत्र वाढवत नेले. शिवाय आपल्या शिक्षणाचा आणि अनुभवाचा फायदा इतर शेतकरी बंधू भगिनींना व्हावा याउद्देशाने ट्रेनिंग सेंटर सुरु केली. भारतात आणि परदेशात जे आधुनिक तंत्रज्ञानाने प्रयोग चालू आहेत त्यात भाग घेऊन ते प्रयोग आपल्या शेतात यशस्वी रित्या राबविले. त्यांचे अनेक रिसर्च पेपर प्रकाशित झाले आहेत.

शेतकरी संघ बांधूना वेग वेगळ्या ठिकाणी असलेले शेती उत्पादन एकत्रित उपलब्ध करून दिले. सेंद्रिय उत्पादनला सर्टिफिकेटची सुरुवात केली, महानगरात विक्री केंद्रे  सुरु केली त्यामुळे ग्राहकांमधील विश्वासार्हता वाढली. हे सर्व कर्तृत्व एका दशकातील. याची नोंद समाजाला घ्यावी लागली. अनेक पुरस्कार मिळाले. विशेष उल्लेखनीय म्हणजे दै. सकाळचा पुरस्कार आणि भारतातील 110 शेतकरी महिलातून केंद्रीय कृषी मंत्रालयाचे महिला किसान सन्मान प्रथम पारितोषिक मिळाले.

ग्रामीण भागातील मुलींना त्यांच्या पासून प्रेरणा मिळाली आहे. त्यांच्याकडे स्वातीताई विशेष लक्ष देतात.

श्रोत्याच्या प्रश्नांना समर्पक उत्तरे स्वातीताईनी दिली. इतकी उत्तुंग भरारी मारली ती सांसारिक जबाबदाऱ्या सांभाळून. नातेवाईक साशंक होते तरी पतीचा पूर्ण पाठिंबा आणि सहकार्य होते हे त्यांनी नमूद केले. त्यांच्या सांगण्यात अभिमान होता आणि प्रामाणिक नम्रताही.

"विद्या विनयेन शोभते" म्हणतात त्याचा प्रत्यय या कृषी दुर्गेने आज दिला. ऐकणारा  अवाक आणि भारावून गेला होता. एकदा पंदरे गावी जाऊन प्रत्यक्ष बघण्याची इच्छा अनेकांनी व्यक्त केली.

आता पुढील दुर्गा कोण याची उत्सुकता लागली आहे.

Watch Video



# नवीन सभासद आणि सॅटेलाईट क्लब इंडक्शन

## २३ ऑगस्ट २०२१

### ॲन नेहा वाळिंबे

करोना साथ रोगामुळे असलेले निर्बंध काही प्रमाणात कमी झाल्यामुळे दिनांक २३ ऑगस्ट २०२१ रोजी सेवासदन हायस्कूल या आपल्या नेहमीच्या सभेच्या ठिकाणी रोटरी वर्ष २०२१-२२ मधील पहिलीच साप्ताहिक सभा अतिशय उत्साहात पार पडली. जवळजवळ 1 वर्षानंतर सगळेजण एकमेकांना प्रत्यक्ष भेटल्यामुळे वातावरणात एक आगळाच आनंद होता.

या वर्षी आपल्या रोटरी परिवारात नव्याने सहभागी झालेल्या सभासदांचा इंडक्शन कार्यक्रम या सभेत आयोजित केला होता.

या वर्षाच्या सुरुवातीपासूनच मेंबरशिप कमिटीचे डायरेक्टर रो. योगेश नांदुरकर, न्यू मेंबर रीक्रूटमेंट अँड ओरीएनटेशन कमिटी चे चेअरपर्सन पी. पी. रो. अनिल गोगटे आणि क्लब एक्सटेन्शन कमिटी चे चेअरपर्सन रो. अभिजीत देशपांडे यांनी अतिशय जोमाने काम सुरू केले आहे.

ऑगस्ट या मेंबरशिप मंथ चे औचित्य साधून दररोज क्लब मेंबर्सना व नॉन-रोटरीयन्सना आवाहन करणारे उत्तम विडियो आपण दररोज पहात आहोतच.

रोटरी क्लब ऑफ पुणे साऊथ च्या परिवारात नितिन कुलकर्णी आणि संदीप अवधानी हे दोन नवे सभासद जोडले गेले. प्रेसिडेंट अतुल अत्रे व रो. हेमंत वाळिंबे यांनी या दोन सभासदांची ओळख करून दिली.

या वर्षीची सर्वात उल्लेखनीय गोष्ट म्हणजे आपल्या क्लब द्वारे रोटरी सॅटलाइट क्लब ऑफ पुणे गोल्ड व रोटरी सॅटलाइट क्लब ऑफ पुणे लिटरेचर या दोन अतिशय उत्तम सॅटलाइट क्लब ची स्थापना करण्यात आली. त्या माध्यमातून अनेक वेगवेगळ्या क्षेत्रातील तरुण मंडळी आपल्यात सामील झाली.

त्यातील रोटरी सॅटलाइट क्लब ऑफ पुणे गोल्डचे चेअरपर्सन ओंकार जोशी, सेक्रेटरी अदिती किरपेकर, अक्षय किरपेकर व अनुश्री आठल्ये यांचे इंडक्शन यावेळी पार पडले. पी. पी. रो. विरेन्द्र शाह यांनी त्यांची ओळख करून दिली. अशा रीतीने किरपेकर कुटुंबीय पूर्णपणे रोटरियन झाले आहे.

रोटरी सॅटलाइट क्लब ऑफ पुणे लिटरेचरच्या चेअरपर्सन उल्का पासलकर, कादंबरी सहस्रबुद्धे, प्रचिती तलाठी-गांधी, प्राजक्ता कोळपकर व शिरीष भागवत यांचेही इंडक्शन यावेळी पार पडले. रो. योगेंद्र नातू यांनी त्यांची ओळख करून दिली.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या म्हणून असिस्टंट गव्हर्नर रो. धनश्री जोग या उपस्थित होत्या. मागील वर्षी पॉल हॅरिस फेलोशिप व रोटरी फाऊंडेशनला देणगी दिलेल्या सभासदांना त्यांच्या हस्ते पिन्स देण्यात आल्या.

आपल्या भाषणात त्यांनी आपल्या क्लब द्वारे चालू असलेल्या सर्व उपक्रमांचे कौतुक केले व रोटरी क्लब ऑफ पुणे साऊथ हा डिस्ट्रिक्ट मध्ये सर्व उपक्रमात अग्रेसर असल्याचे नमूद केले.

कार्यक्रमानंतर रो. माधुरी किरपेकर, रो. मृदुला घोडके व सेक्रेटरी रो. किरण आणि ॲन स्वाती वेलणकर यांनी दिलेल्या पुराणपोळीच्या जेवणाचा आनंद बरेच दिवसांनी भेटलेल्या मित्रांबरोबर घेणे हा एक आनंदसोहळाच होता त्यामुळे उशीर होऊनही घरी जाण्यास सर्वांचेच पाय निघत नव्हते.

असा हा आपल्या क्लबच्या परंपरेला साजेसा दिमाखदार व चविष्ट सोहळा अत्यंत उत्साहात पार पडला.















# पाऊसधारा

## ३० ऑगस्ट २०२१

## ॲन चित्रा प्रभुमिराशी

दरवर्षीप्रमाणे यावर्षीही ' पाऊसधारा ' या नावाने एक विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम आपल्या क्लब मध्ये सादर झाला .आपल्या क्लबच्या गुणी व उत्साही  लेडी रोटेरियनस, ॲन आणि ॲनेट्स  यांचा सहभाग होता, ॲन यामिनी पोंक्षे हिने अतिशय प्रभावी असे निवेदन केले . कार्यक्रमाची सुरुवात राग मेघ मल्हार मधील गदिमांच्या गाजलेल्या गाण्याने  झाली. रो. विजया गुजराथी यांनी घनघन माला या गीताने केली त्यामुळे एक सुंदर माहोल तयार झाला. त्यानंतर ॲन माधवी देशपांडेने भारतातील वेगवेगळ्या प्रांतातील खाद्य संस्कृती याचा आढावा थोडक्यात घेतला . त्यानंतर पी. पी. रो. सोनलने स्त्रीमनाचे वयाप्रमाणे बदलत जाणारे भाव तिच्या दोन्ही कवितातून दाखविले . प्रिय सख्याच्या भेटीसाठी आतुर झालेलं मन' अधीर मन झाले' या गाण्यावर नृत्य सादर करून ॲन अंजली पाषाणकर  छान व्यक्त केले. ॲन राधिका वाघमारे हिने 'रिमझिम झरती श्रावणधारा' या गीतातून प्रेयसीची व्याकुळता तिच्या भावपूर्ण आवाजात छान व्यक्त केली. तसेच ॲन ऋचा नांदूरकरने अमोल पालेकर यांच्या "थोडासा रुमानी हो जाये” या चित्रपतील नाना पाटेकर यांचा एक प्रसंग खूप ताकदीने सादर केला . नवतरुण जोडपे व पाऊस  ॲन गौरी क्षीरसागर व  रो. डॉ. संगीता देशपांडे यांनी श्री 420 मधील गाण्यावर नाच करून बहार आणली. ॲन प्रिया अंबिकेने स्वतः लिहिलेली गोष्ट सांगून ऐकण्यात खूप आनंद मिळाला. ॲनेट श्रेया करंदीकर हिने घटा सावन की या गाण्यावर सुंदर कथक नृत्य सादर केले. रो. श्वेता करंदीकरने स्त्रीच्या जीवनातील पाऊस खूप छान शब्दात व्यक्त केला. ॲनेट मुक्ता देशपांडेच्या मेघमल्हार मधील गरज गरज आज मेघ या गाण्याने कार्यक्रमाची सांगता झाली. सर्व कलाकारांचा उत्तम सहभाग व ॲन यामिनी चे निवेदन यामुळे कार्यक्रम छान झाला. तिने खूप सुंदर गजरा गुंफला. सर्व मंडळींना कार्यक्रम खूप आवडला .

शेवटी फर्स्ट लेडी नंदिनी अत्रे यांनी सर्व  सहभागी ॲन, ॲनेट्स व रोटेरिअन्स तसेच विशेष सहकार्याबद्दल रो. मृदुला घोडके व तांत्रिक सहकार्याबद्दल रो. अभिजित देशपांडे व रो. हेमंत वाळिंबे या सर्वांचे आभार मानले.

Watch Video




Rotary Club Of Pune South

Rotary | SERVE TO CHANGE LIVES




Rotary Club Of Pune South

Rotary | SERVE TO CHANGE LIVES




Rotary Club Of Pune South

Rotary | SERVE TO CHANGE LIVES











# पूर्णांगिनी - ॲन रेखा विनायक जोशी

## ॲन अस्मिता आपटे



मिसेस जोशी अकाउंटिंग अकॅडमी च्या संस्थापक आणि संचालक रेखा विनायक जोशी. सीएच्या विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्रपणे  अठ्ठावीस वर्षाहून अधिक वर्षे कोचिंग क्लासेस घेणारी संपूर्ण महाराष्ट्रातील एकमेव महिला आहे. आपल्या रोटरी परिवारात सहज मिसळून गेलेली अतिशय मृदुभाषी शांत रेखा स्वतःविषयी कधीच काही बोलत नाही. कन्नड भाषेतून शालेय शिक्षण घेतलेली धारवाड ची रेखा पटवर्धन. घरी जुन्या वळणाचं वातावरण.

रेखाने वडिलांजवळ मला सीए करायचे आहे म्हटल्यावर वडील म्हणाले तू आपली बीकॉम आणि एम कॉम हो आपण तुझं लग्न करू. तू सीए झालीस तर तुला त्यापेक्षा उच्चशिक्षित नवरा बघावा लागेल. निमुटपणे वडिलांचे रेखाने ऐकले.  रेखान एम कॉम थर्ड रँक मध्ये पास झाली. धारवाडच्या गव्हर्नमेंट कॉलेजमधून बोलावणे येऊन लेक्चरर म्हणून रुजू झाली .2 वर्षानंतर वडिलांची बदली पुण्यात झाल्यामुळे  तिला नोकरी सोडून देऊन पुण्यात यावे लागले.

पुण्यात आल्या नंतर विनायक जोशी यांच्याशी तिचा विवाह झाला. त्यानंतर तिने एम फिल पूर्ण केल. एक-दोन वर्षे लेक्चरर म्हणून नोकरी केली. सहज बोलता बोलता सासूबाई तिला म्हणाल्या अगं तुला सीए व्हायचं होतं ना मग ते तू आता का करत नाहीस. त्यावेळी रेखा ची मुलगी गायत्री फक्त तीन महिन्यांची होती. सासूबाईंनी तिला सांगितलं तू फक्त अभ्यास कर घरातलं मी सगळ सांभाळते. धन्य ती माऊली! विनायक यानींही  पूर्ण सपोर्ट दिल्यामुळे रेखा निश्चिंतपणे 12 ते 14 तास ग्रंथालयात बसून अभ्यास करत असे. मुळातच हुशार असलेल्या रेखाने तीन वर्षात प्रथम प्रयत्नातच सीए पूर्ण केल. सासुबाई आणि विनायक यांच्या विशेष सहकार्यामुळेच सीए शक्य झालं असं रेखा आवर्जून सांगते.

सीए झाल्यावर नोकरीची संधी चालून आली पण तिने ती नाकारली. शिकवण्याची मुळातच हौस असल्याने एक छोटा हॉल भाड्याने घेऊन अकॅडमी सुरू केली. बावीस विद्यार्थ्यांच्या पहिल्या बॅचमधून तीन विद्यार्थी मेरिटमध्ये आले. रेखाचा उत्सव वाढला मोठ्या आत्मविश्वासाने आणि हिमतीने नवीन जागा घेतली. काही दिवसांनी विद्यार्थी संख्या वाढल्याने ती जागा कमी पडू लागली. त्यानंतर आता भव्य जागेमध्ये म्हणजे एका हॉलमध्ये 500 विद्यार्थी बसतील असे दोन हॉल असलेली जागा रेखाने घेतली. अद्यावत तंत्रज्ञानाचा वापर करून  मोठ्या स्क्रीनच्या साह्याने रेखा विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत असते. साधारणपणे दरवर्षी अडीच ते तीन हजार विद्यार्थी तिच्या अकॅडमी मध्ये शिक्षण घेत असतात. रेखाला वेळोवेळी रो. विनायक यांचे सहकार्य लाभते

रेखाला बागकाम, ड्रॉइंग, घर सजावट ह्या आवडी बरोबरच विशेष आवड आहे ती प्रवासाची. अर्थात रो. विनायक यानाही प्रवासाची आवड असल्याने दोघेजण दरवर्षी प्रवासाला जातात. त्यांच्या प्रवासाचे वैशिष्ट्य म्हणजे ते वेगळ्या प्रकारचा म्हणजे काहीतरी  ॲडव्हेंचर असेल अशा ठिकाणी त्यांचा प्रवास असतो .त्या दोघांनी अंटार्टिका मध्ये मायनस डिग्री टेंपरेचर मधे तेरा दिवस जहाजावर राहून बर्फातील प्राणीजीवन जवळुन पाहायचा अनुभव घेतला. वॉटर फॉल्स च्या इथे बंजी जंपिंग केले. अमेरिकेतील लाईव्ह व्होल्कॅनो पहायला हेलिकॉप्टर राईड घेतली. सर्व बाजूनी लाव्हा समुद्रात मिसळताना चे दृश्य पाहण्याचा अनुभव खूपच वेगळा होता.

एका मध्यमवर्गीय मराठी कुटुंबातील संसारी स्त्री रेखा स्वतंत्रपणे आणि जिद्दीने मोठा कोचिंग क्लास चालवत आहे. यशस्वी गृहिणी यशस्वी शिक्षिका यशस्वी उद्योजिका. प्रेमाने नातेसंबंध जपणाऱ्या समाधानी रेखाला यशस्विनी पूर्णांगिनी म्हणूया.




**दिवसाला तब्बल ६००० उत्तरपत्रिका तपासू शकणारी अत्याधुनिक संगणक प्रणाली विकसित करणाऱ्या रो. हेमंत वाळिंबे यांच्या व्यावसायिक आणि रोटरी मधील प्रवासाबद्दल रो. आनंद कुलकर्णी (AK) याने त्यांच्याशी मारलेल्या गप्पा.**

Watch Video




## Donations



District Foundation Chair PP Rtn. Pankaj Patel and PDG Rtn Bhausaheb Kudale $500 to TRF

**PDF Rtn. Bhausaheb Kodale donated $500 to TRF. He handed over the cheque to District Foundation Chair PP Rtn. Pankaj Patel.**

---

## श्री. रणजित पाल - सोया मिल्क प्रशिक्षण

**दुधाला उत्तम पर्याय म्हणून सोया मिल्क उपयुक्त आहे. सोया मिल्कमध्ये प्रोटिन्स भरपूर असतात आणि तरीही त्याची किंमत मात्र खूपच कमी असते. हे घरच्या घरी तयार करता येते आणि त्यात चांगली पोषणमूल्ये असल्यामुळे आहारात त्याचा समावेश असणे चांगले असते.**

**आपले पीडीजी भाऊसाहेब यांचे मित्र श्री. रणजित पालसाहेब सोया मिल्कचे उत्पादन करतात. खेड्यातल्या गरीब कुटुंबांतल्या महिलांना सोया मिल्क तयार करण्याचे प्रशिक्षण देण्याचे वर्कशॉप मागच्या वर्षी आपले दत्ताजी देवधर यांच्या फार्म हाऊसवर झाले होते.**

**अनेक महिलांनी या वर्कशाॅपमध्ये सहभाग घेतला आणि सोया मिल्क तयार करण्याचे प्रशिक्षण पालसाहेबांकडून घेतले. तेव्हा त्यांनी या महिलांना सोया मिल्क तयार करण्याची उपकरणे मोफत दिली.**

**श्री. रणजित पालसाहेब भाऊसाहेबांना भेटले आणि हा प्रकल्प अजून काही खेड्यांत राबवावा असा मनोदय त्यांनी व्यक्त केला. त्याकरता त्यांनी आपल्या ट्रस्टला १ लाख रुपयांचा धनादेश दिला आणि इतरही मदत करण्याची इच्छा दर्शवली.**

**खूप खूप धन्यवाद पालसाहेब आणि भाऊसाहेब !!**

## मोफत टेस्ट सिरीज



वसंतदादा पाटील विद्यालय इथे आपला इको क्लब आहे. त्यांच्याकडील ८ वी मधील २५ विद्यार्थ्यांना स्कॉलरशीपच्या परीक्षेकरता मोफत टेस्ट सिरीज आपल्या क्लबनं उपलब्ध करून दिली. हे काम आपले युथ डायरेक्टर रो. हेमंत वाळिंबे यांनी त्यांची कंपनी स्मार्ट कॉम्प्युटर्सतर्फे मोफत केले. त्याबद्दल रो. हेमंत वाळिंबे यांना धन्यवाद!

## चिपळूणच्या लोकमान्य टिळक वाचन मंदिर या संस्थेला मदत



Ulka Pasalkar, Pres. Rtn. Atul Atre, Sec. Rtn. Krishnakiran Velankar

चिपळूणच्या लोकमान्य टिळक वाचन मंदिर या संस्थेला आपला सॅटॅलाइट क्लब साउथ लिटरेचरकडून १०००० रुपये , त्या क्लब च्या चेअर उलका यांनी आज रो. प्रे. अतुल अत्रे यांच्या हस्ते ट्रान्सफर केले.

सॅटॅलाइट क्लब साउथ लिटरेचर चे सर्व सदस्य व डोनरस् यांना मनःपूर्वक धन्यवाद !

## Rotary Club Pune South was felicitated by Tarachand Ramnath Hospital.



Rotary Club Pune South is a very old partner of Tarachand Ramnath Hospital for community service in healthcare through various donation drives and programs.

In recognition of this, our Club was felicitated at the 95th Foundation Day of Tarachand Ramnath Hospital. Our Club was represented by Pres. Rtn. Atul Atre, Rtn Dr Vijaya Gujarathi and

## गोदान



८ ऑगस्ट रोजी पी. पी. रो. विनोदभाई अगरवाल यांनी त्यांच्या मातोश्री आणि ॲन सरिता भाभी यांच्या वाढदिवसाचं औचित्य साधून दोन गायींचं दान गोदान प्रकल्पाअंतर्गत केलं. समारंभाला पी. पी. रो. गोरे सर, रो. नितीन पाठक, रो. विजयाताई गुजराथी, सरिताभाभी तसंच विनोदभाई यांचे कुटुंबीय उपस्थित होते. विनोदभाई व सरिताभाभी यांचे मनःपूर्वक धन्यवाद !

---

## District Membership Awards




**Our club received a whooping 3 awards in the District Membership Seminar held on 31st August 2021 at the hands of PRID Rtn Kamal Sanghvi - RI Chair, Membership.**

**We received district awards for Best Performing Club in Membership (1st Rank), Overall Membership Growth and Women Membership Growth**

**AG Dhanashree Jog was also present on the occasion.**

**Heartiest congratulations Pres. Rtn. Atul Atre, Membership Avenue Director Rtn. Yogesh Nandurkar and all membership chairs.**

**RCPS Rotarian and AG Sandeep Vilekar also received the award for Membership Growth in the Region. Congratulations AG Rtn Sandeep.**






# उद्योग, व्यापार आणी शिक्षण

**पी.डी.जी. रो. अरुण कुदळे**

आपल्या देशामध्ये शिक्षणाचे मोठ्या प्रमाणावर  व्यापारीकरण झाले त्याला जवळ जवळ चार दशकाचा काळ उलटून गेला. काही प्रमाणात उच्च शिक्षण महाग होणे, हे समजू शकते. परंतु ह्या शिक्षणाच्या अवाजवी खाजगीकरणामध्ये आमचे प्राथमिक आणी माध्यमिक शिक्षण सुद्धा महाग झाले, मध्यमवर्गाच्या आवाक्याबाहेर गेले, हे समजू शकत नाही. ह्या सर्व शिक्षण क्षेत्रातील स्थित्यन्तरांचा परिणाम शैक्षणिक गुणवत्तेवर झाला. आमच्या कोणत्याही क्षेत्रातील कॉलेजेस मधून बाहेर पडलेल्या पदवी अथवा पदविका धारकांचा थेट उपयोग उद्योग, व्यापारात किंवा इतर सेवा क्षेत्रात होत नाही, ही आजची वस्तुस्थिती आहे. शाळा कॉलेज च्या बाहेरील जगात यशस्वी होण्यासाठी जे कसब लागते, जो माहितीचा खजाना लागतो, जो व्यक्तिमत्त्वामध्ये ज्याला आपण इंग्रजी भाषेत "street smartness " असे म्हणतो, ते कुठेच शिकविले जात नाही. त्यामुळेच आई-वडिलांच्या कष्टाने मिळविलेल्या पैश्याचा योग्य विनियोग मुला-मुलींचे भवितव्य घडविण्यासाठी होत नाही, असे दुर्देवाने म्हणावे लागते. शिक्षणाचा उपयोग अर्थार्जनासाठी, स्वतःच्या व कुटुंबियांच्या उदरनिर्वाहासाठी झालाच पाहिजे, ह्या बद्दल कोणाचेही दुमत असणार नाही. केवळ घोकंपट्टीने, विषय न समजता परीक्षेमध्ये मार्क मिळविणे व त्यातच इतिकर्तव्यता समजणे ह्या मुळे आपल्या शिक्षणाची व्यावहारिक उपयुक्तता संपली आहे. हे समजत असूनसुद्धा आमचे शिक्षण महर्षी हे आर्थिक लाभाच्या हव्यासापोटी शिक्षण सम्राट बनले आहेत आणी हे चित्र आपल्या देशाच्या प्रगतीला मारक ठरणारे आहे.

शिक्षणाची उपयुक्तता वाढवून ते अधिक समाजोपयोगी करण्याचे प्रयत्न झाले नाहीत असे नाही. शिक्षणाच्या चाकोरीबद्ध यंत्रणेतून बाहेर पडणारा विद्यार्थी अधिक सक्षम होण्यासाठी पुण्यातील ज्ञान प्रबोधिनी ह्या शाळेने अनेक वर्षे यशस्वी प्रयोग केलेला आहे. पुस्तकी अभ्यासक्रमा व्यतिरिक्त, वर्गांच्या चार भिंती बाहेरचे शिक्षण  विद्यार्थ्यांना देऊन त्यांना बाहेरच्या जगातील टक्के टोणपे सोसून जीवनामध्ये यशस्वी होण्याची ताकत ह्या शिक्षणाने दिलेली आहे, हे अनेक यशस्वी विद्यार्थ्यांच्या अभ्यासानंतर सिद्ध झाले आहे

सध्याचे  भारतीय सेनेचे चीफ ऑफ द आर्मी स्टाफ जनरल मनोज मुकुंद नरवणे हे ज्ञान प्रबोधिनीचे विद्यार्थी आहेत, हे एकच उदाहरण ज्ञान प्रबोधिनी च्या यशस्वी शैक्षणिक उपक्रमाची ग्वाही देण्यासाठी पुरेसे बोलके आहे, असे मला वाटते. पण हा सर्व प्रयोग बुद्धिमान विद्यार्थ्यांसाठी मर्यादित आहे. सर्व सामान्य विद्यार्थ्यांना व्यावहारिक उपयुक्ततेचे शिक्षण देऊन त्यांना सन्माननीय नागरिक बनविण्याचा प्रयोग पुण्यातीलच ज्ञानेश्वर विद्यापीठाने अंदाजे ३० वर्षे राबविला. पुढे काही कारणाने हा प्रयोग बंद पडला. ज्या कोणाला इंजिनियरिंग चे शिक्षण घेण्याची तीव्र इच्छा आहे, त्या सर्वांना ह्या संस्थेत प्रवेश मिळत असे. शिक्षणाचा खर्च तर अत्यल्प होताच पण अनेक प्रकारची लवचिकता त्यांच्या अभ्यासक्रमाद्वारे विद्यर्थ्यांना उपलब्ध करून देण्यात आली होती. सामान्यतः ज्या विद्यार्थ्यांना प्रवेश परीक्षेत कमी मार्क मिळाले होते किंवा ज्यांची घरची आर्थिक परिस्थिती प्रचलीत सरकारी साचेबंद अभ्यासक्रमासाठी लागणारी फी भरण्याची नव्हती, अशा

विद्यार्थ्यांचा ओढा ज्ञानेश्वर विद्यापीठाकडे असे. पुष्कळदा नोकरी करून विद्यार्थी संध्याकाळचे क्लासेस जॉईन करीत असत. त्यांच्या सुट्टीच्या वारी देखील त्यांना क्लास अटेंड करण्याची मुभा असे. प्रवेशासाठी मार्कांची अथवा कोणत्याही विषयाची बंधने नव्हती. फी सुद्धा अत्यंत माफक असूनही ती हप्त्याने भरण्याची सोय होती. विद्यार्थी आपापले प्रयोग त्यांच्या कामाच्या ठिकाणीच करीत असत. त्यांच्या कंपनीचे मालक अथवा वरीष्ठ मंडळी त्यांना असे प्रयोग करण्यासाठी मान्यता देत असतंच पण प्रसंगी मार्गदर्शनही करीत असत. ह्या प्रयोगातून त्या कंपनीतील अनेक प्रश्नांची उत्तरे मिळाल्याची किंवा काही जटील समस्यांची उकल झाल्याची कबुली अनेक विद्यार्थी अथवा त्यांचे वरीष्ठ देत असत. खऱ्या अर्थाने इंडस्ट्री आणी इन्स्टिट्यूट यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांचे शिक्षण पूर्ण होऊन त्यास यथावकाश पदवी अथवा पदविका प्रदान होत असे. अनेक नामवंत शिक्षण महर्षी व प्रख्यात उद्योगपती यांनी नावाजलेला हा उपक्रम बंद पडावा, या सारखा  दुसरा दैव दुर्विलास नाही.

आपल्या शिक्षण पद्धतीची ही मर्यादा लक्षात घेऊन अनेक नामवंत कॉर्पोरेट संस्थांनी उमेदवाराची प्राथमिक निवड झाल्यावर त्याला आपल्या कामासाठी तयार करण्यासाठी आपापल्या ट्रेनिंग संस्था उभ्या केल्या. कंपनीतील प्रत्यक्ष कामकाजास सुरुवात करण्यापूर्वी नवीन उमेदवारास ह्या ट्रेनिंग मधून पार व्हावे लागते. अशा ट्रेनिंग देणाऱ्या स्वतःच्या ट्रेनिंग संस्थांना कॉर्पोरेट जगात 'फिनिशिंग स्कुल ' असे म्हणतात. अशा प्रकारच्या फिनिशिंग स्कुल उभारण्याची गरज उद्योग व्यवसायांना भासली, कारण आमची शिक्षण पद्धती त्यांना पाहिजे असलेल्या गुणवत्तेचे किंवा कसबाचे उमेदवार तयार करून देऊ शकत नव्हती म्हणूनच. उद्योग व्यवसायांच्या दृष्टीने हा खर्च उत्पादन व विक्री च्या खर्चाच्या व्यतिरिक्त असलेला अतिरिक्त खर्च होता व आहे. शिक्षण संस्थांनी केवळ पुस्तकी प्राध्यापक न नेमता उद्योग क्षेत्रात काही वर्षे अनुभव घेतलेली मंडळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी नेमली तर हा प्रश्न बऱ्यापैकी सुटू शकेल.

त्याचबरोबर शिक्षण संस्थांनी औद्योगिक जगताशी सातत्याने संपर्क  ठेवला पाहिजे. ग्राहकांच्या गरजा व अपेक्षा ह्या कायम वेळेनुसार बदलत असतात. ह्या बदलाचा अभ्यास शिक्षण संस्थांनी व उद्योगव्यवसायानी सतत केला पाहिजे व त्या नुसार आपल्या उत्पादनात व शैक्षणिक अभ्यासक्रमात योग्य ते बदल तत्परतेने केले पाहिजेत. यालाच मी 'डायनॅमिक अभ्यासक्रम' व 'डायनॅमिक उत्पादन पद्धति' असे म्हणतो.

अमेरिकेमध्ये व्यवसायानिमित्त गेलो असताना मला अनेक वेळा काही नामवंत शिक्षण संस्थांना भेट देण्याची संधी मिळाली. त्यातील कोलंबस शहरातील ओहिओ स्टेट युनिव्हर्सिटी ला दिलेली भेट मला अजूनही आठवते. मेकॅनिकल इंजिनियरिंग डिपार्टमेंट ला मी गेलो होतो. त्यांच्या लॅब मध्ये अनेक मोठ्या उद्योगांचे प्रकल्प विद्यार्थ्यांनी हाताळण्यासाठी व त्यांच्या प्रश्नांची उकल करण्यासाठी आले होते. त्यातील काही प्रकल्प नवीन संशोधनाचे विषय होते तर काही त्यांच्या कारखान्यातील नेहमीच्या उत्पादनातील अडचणी सोडविण्यासाठी आले होते. अनेक तरुण विद्यार्थ्यांचे समूह छोट्या छोट्या

तुकड्या करून त्या प्रकल्पावर काम करताना दिसत होते. त्यासाठी लागणारे भले मोठे फंड सुद्धा त्या त्या उद्योगांनी युनिव्हर्सिटीला दिले होते. निरनिराळ्या प्रकल्पांच्या अभ्यासासाठी त्या त्या उद्योगांनी देऊ केलेल्या आर्थिक मदतीची मोठी यादी एका बोर्डावर सर्व अभ्यागतांना दिसेल अशी लावली होती. सर्व व्यवहारात पूर्ण पारदर्शकता पाळली जात असे. इंडस्ट्री व शैक्षणिक संस्था हातात हात घालून एकमेकांचे प्रश्न समजून घेऊन त्या त्या प्रश्नांचे सोल्यूशन शोधण्यामध्ये एकमेकाला सहायक ठरत होते. कॉलेजच्या अभ्यासक्रमात इंडस्ट्रीचे प्रश्न समाविष्ट केले होते. आपला अभ्यासक्रम पूर्ण करीत असताना ते विद्यार्थी उद्योगांचे प्रश्नही सोडवत होते, ज्या योगे उद्योगांना नेमके काय पाहिजे ते शिक्षकांना व विद्यार्थ्यांना समजत होते. आपोआपच विद्यार्थ्यांची तयारी शिक्षण पूर्ण होत असतानाच उद्योगांचे प्रश्न हाताळण्याची समज येऊन परिपूर्ण होत असे. अशा प्रकारचे दृष्य आपल्याकडील शिक्षण संस्थांमध्ये अभावानेच दिसते. शिक्षण संस्थेमधून बाहेर पडणारा विद्यार्थी हे त्या शिक्षण संस्थेचे प्रॉडक्ट आहे व हे उत्पादन उद्योगव्यवसायांना डायरेक्ट उपयोगी पडले पाहिजे असा दृष्टिकोन देशाची शैक्षणिक पॉलिसी ठरविणाऱ्या राज्यकर्त्यांनी ठेवला पाहिजे व त्यातच आपले खरे हीत आहे.

नवीन तंत्रज्ञानाचा वापर शिक्षणक्षेत्रामध्ये आता आपल्या देशामध्ये सुरु झालेला आहे, ही मोठ्या आनंदाची बाब आहे. करोनाच्या महामारीने दूर शिक्षण पद्धती आपल्याला आत्मसात करण्यास भाग पाडले आहे. त्यातून शिक्षक,पालक व विद्यार्थी ह्या सगळ्यांचीच मानसिकता बदललेली आहे, हा न्यू नॉर्मल चा एक फायदाच आहे असे म्हटले तर वावगे ठरू नये. यातूनच अंतरे जवळ येण्याची प्रक्रिया आपोआपच घडत आहे. म्हणून औद्योगिक व व्यापारी संस्था ह्या शिक्षण क्षेत्राच्या खूप जवळ येतील. व्यावहारिक शिक्षणाची मोठी क्रांती त्यातून होईल. भारत सरकारच्या स्कील डेव्हलपमेंट च्या योजनेला त्यातून मोठे यश मिळेल व आमचे विद्यार्थी अधिकाधिक व्यावहारिक शिक्षणाने प्रगल्भ व सर्व जगामध्ये उत्पादक वर्क फोर्स म्हणून प्रसिद्ध पावतील ह्या बाबत माझ्या मनात काहीही शंका नाही. मात्र जपानी तरुणांप्रमाणे कार्य संस्कृतीची कास त्यांनी धरणे आवश्यक आहे.






# Three Cups of Tea (Part 2)

Rtn. Dr. Subhash Deshpande

रावळपिंडीला पोहोचल्यावर ग्रेग ला शाळेकरीता लागणारे साहित्य खरेदी करावयाचे होते. त्याकरिता ग्रेग ज्या हाॅटेल मध्ये ऊतरला होता त्या हाॅटेलचा चौकीदार मदतीकरीता धावून आला. सर्व बाजारात हिंडून अब्दुल ने घासाघीस करीत बांधकाम साहित्य जमविले. सिमेंट, लाकूड, प्लायवूड, खिळे, जमवता जमवता व घासाघीस करता करता तीन दिवस गेले. सरते शेवटी ग्रेग साहेबांची स्वारी काराकोरम हायवेवरून बाल्टीस्तान मार्गे कोर्फेला निघाली. रस्ता अत्यंत बिकट होता. एका बाजुला डोंगराचा सरळ कडा तर दुसऱ्या बाजूस खोल दरीतून वाहणारा सिंधू नदीचा प्रवाह. वाटेत एका पुलाजवळ तालीबान सैनिकांनी सर्व वाहतूक अडवून धरली होती.ग्रेगचे नशीब थोर की तो अमेरिकन असून सुद्धा त्याला कुठल्याहि प्रकारची इजा पोहोचविण्यात आली नाही. रात्रभर रस्त्यावर राहून दुसऱ्या दिवशी परत वाहतूक सुरू झाली. अशारितीने भरगच्च भरलेल्या ट्रकवर बसून ग्रेग एकदाचा सिंधू नदीच्या दरीतून स्कार्डू खोऱ्यात आला.ट्रकभर इमारतीचे सामान पाहून स्कार्डू मधील सर्वांच्याच तोंडाला पाणी सुटले.

स्कार्डू मधील चॅन्गॅझी नावाच्या ओळखीच्या माणसाकडे सर्व साहित्य ठेवले गेले. प्रत्येकाचा, ग्रेग ला आपले गाव दाखवून, तेथे शाळा बांधण्याचा आग्रह सुरू झाला. अक्षरश:,ग्रेग ची खेचाखेच सुरू झाली. चॅन्गॅझीने सर्व सामान त्याच्या गावी हलविले,आणि ग्रेग ला त्याच्या गावी शाळा बांधण्यास सांगीतले. परन्तु ग्रेग त्याच्या निश्चयापासून ढळला नाही.शेवटी ग्रेगला, सामानासकट, कोर्फे येथे पोहोचवणे,चॅन्गॅझीला भाग पडले. कोर्फे गाव नदीच्या पलीकडे होते. नदी एका दोराच्या पाळण्यातून ओलांडून जावी लागे,जो पाळणा स्वत:च ओढत पलीकडे न्यावा लागत असे. कोर्फेत ग्रेगचे जंगी स्वागत झाले.आता सर्वात पहिला अडथळा पार करावयाचा होता.शाळेच्या इमारतीचे सामान स्कार्डू हून कोर्फेला आणावयाचे होते,व ते वजनदार साहित्य नदीपलीकडे न्यावयाचे होते. सामान पलीकडे नेण्यास भक्कम पूल उपलब्ध नव्हता. म्हणजेच प्रथम पूल बांधावयास पाहीजे. ग्रेग कोर्फेच्या नदीवर पूल बांधण्याची योजना करू लागला. पुलाचा आराखडा रेखाटला गेला.

जागाही ठरविण्यात आली. पत्थर कोठून आणायचे हे सुद्धा ठरले. फक्त पैसे कसे उभे करायचे हे माहीत नव्हते. ग्रेग कडे असलेले सर्व पैसे आधीच शाळेच्या सामानासाठी खर्च झाले होते.ग्रेग निधी उभारण्यासाठी दोन महिन्यांनी अमेरीकेत परतला. स्वत: कफल्लक, त्यात त्याच्या प्रेयसीने दगा दिलेला, खिशातील शेवटचे दोन डॉलर्स पण रस्त्यात वाटमाराने लूटले. एकच समाधानाची बाब म्हणजे ग्रेग ला नोकरी लागली होती. ग्रेग ने K2 प्रथम सर करणारे, सर रिचर्ड यांच्या सल्ल्यानुसार, परत जीन हॉर्नीला फोन केला. हॉर्नीनेच ग्रेगला शाळा बांधण्यास प्रथमतः पैसे दिले होते. हॉर्नी परत ग्रेगच्या मदतीला देवासारखा धावला व त्याला दहा हजार डॉलर्सची मदत दिली. ग्रेग पूल बांधण्यासाठी स्कार्डूला परतला व चॅन्गॅझीच्या मदतीने पूलाचे बांधकाम साहित्य खरेदी करू लागला. कॉर्फेला सर्व सामान आणताना अनंत अडचणी आल्या. वाटेत रस्ता खचल्याने अठरा मैलावर अडकून बसलेल्या गाड्यांतील सामान ग्रेग आणि कॉर्फेतील लोकांनी खांद्यावरून वाहून आणले. ऑगस्ट 1995 पर्यंत पूल बांधून पूर्ण झाला आणि ग्रेग त्याचे एक कार्य सफल झाल्यामुळे अमेरीकेत परतला.

13 सप्टेंबर 1995 मध्ये ग्रेगला अमेरिकन हिमालयन असोसिएशन च्या वार्षिक जेवण आणि सर एडमंड हिलरी यांचे भाषण ऐकण्यास निमंत्रित करण्यात आले. त्या ठिकाणी त्याला श्रीमती तारा बिषप भेटल्या. तारा बॅरी बिषप ह्या एव्हरेस्ट विराची मुलगी होती. त्यांचे पहील्या नजरेतच प्रेम जमले. सहा दिवसांनी 19 सप्टेंबर रोजी दोघे लग्नाच्या बेडीत अडकले. दोन आठवड्याच्या हनिमून नंतर ग्रेग परत पाकिस्तानात स्कार्डूला परतला. स्कार्डूला चॅन्गाझीच्या घरी गेल्यावर ग्रेगला समजले की चॅन्गाझी घरी नसून रावळपिंडीला गेला आहे व 2-3महीने तरी परत येणार नाही. शाळेचे सर्व साहित्य चॅन्गाझीकडे अडकून पडले होते.चॅन्गॅझीचा कारकून गुलाम पार्वी त्याच्या मदतीला धावला. अनेक अडचणीनंतर ग्रेगला तीन चतुर्थांश सामान परत मिळाले. जे सामान मिळाले ते ग्रेगने कोर्फेला धाडले. स्वत:कोर्फेला पोहोचल्यावर, आतापर्यंत शाळेचा पायासुद्धा, खोदला गेला नाही हे ग्रेगच्या लक्षात आले ग्रेग अत्यंत संतप्त झाला.परन्तू हाजी अलीला त्याचे देणे घेणे सुद्धा नव्हते.संथ जीवन हा त्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग होता,तेव्हा शाळा तयार होण्यास काही महिने उशीर झाल्यास, कोर्फेतील जनतेला कसलाही फरक पडत नव्हता. दुसऱ्या दिवशी नमाज पढून झाल्यावर शाळा बांधण्यास सुरुवात झाली,परन्तु प्रथम एका बोकडाचा बळी दिला गेला व मेजवानी सुरू झाली. शाळेचे बांध काम परत सुरळीत सुरू झाल्यावर ग्रेग  अमेरिकेत त्याची पत्नी ताराकडे परतला.

आतापर्यंत ग्रेगच्या कामाचा गाजावाजा सर्वत्र झाला होता. जीन हॉर्नीने सेंट्रल अशीयाईन् इन्स्टिटय़ूट नावाची संस्था स्थापली व ग्रेगला त्या संस्थेचा मुख्याधिकारी केला. सि ए आय ह्या संस्थेचे मुख्य काम, इतर ठीकाणी सुद्धा शाळा बांधणे हे होते. ताराला दिवस गेले होते, त्याबरोबर त्या दोघांना एक नवीन घर सुद्धा रहायला मिळाले होते. मे 1996 पर्यंत हे सगळे पाठीमागे सोडून ग्रेग परत कोर्फेला परतला. त्याने मुझफ्फर व गुलाम पार्वीला संस्थेत पगारावर मदतीला घेतले. कोर्फेला सिमेंट वगैरे सामान नेण्या आणण्यात अनेक अडचणी येत असत. भुखलन झाल्याने कित्येक मैल सर्व सामान खांद्यावर वाहून न्यावे लागे. यामध्ये मुझफ्फर चा खूप सहयोग असे.

शाळेचे बांधकाम हळूहळू वर येत होते. पण ग्रेग काम लवकर संपवीणयास अधीर झाला होता. शेवटी हाजीअलीने ग्रेगला, त्यांच्या जीवनाचे सूत्र, समजावून सांगितले. त्याने सांगितले की पहिला चहाचा पेला परक्याला दिला जातो, दूसरांदा दिलेला दिलेला चहाचा पेला सन्माननीय पाहुण्याला असतो, तिसरा पेला प्यायल्यावर तो कुटूंबाचा एक भाग बनतो. तेव्हा घाई न करीता शांतपणे व संयमाने माणसे जोडण्याचा सल्ला हाजीअलीने ग्रेगला दिला.हेच ते चहाच्या तीन पेल्यांचे तत्व.

तीन आठवड्यात शाळेच्या भिंती बांधून तयार झाल्या. चॅन्गॅझीने पळविलेल्या लाकडी तुळया परत मिळू न शकल्याने, नवीन तुळया विकत घ्याव्या लागल्या. नेहमीप्रमाणेच त्या तुळया कोर्फेला आणताना भुःखलन झाल्यामुळे वाहने अडकून पडली. हे हाजीअलीच्या लक्षात आल्यावर कोर्फेची सर्व धडधाकट मंडळी, मौलवी सकट, चालत वाहनांपर्यंत आली आणि त्या जड तुळया खांद्यावर उचलून अठरा मैल कोर्फेपर्यंत नेल्या. इथल्या प्रमाणेच बाल्टीस्तानात खंडणी उकळणारे असतातच. असाच एक खंडणीस्वार हाजी मेहदी आपल्या गुंडांसह कोर्फेला आला आणि शाळा बांधण्यास अडथळा न आणण्याकरता बारा बोकडांची मागणी करू लागला.बाल्टीस्तानात बोकड ही संपत्ती समजली जाते.बारा बोकड ही कोर्फेची अर्धी संपत्ती होती, तरीसुद्धा हाजी अलीने हाजी मेहंदीला बारा बोकड दिले. हाजी अली म्हणाला "दू:ख करू नका .हे सर्व बोकड हाजीमेहंदीने खाल्यानंतर सुद्धा ही शाळा हयाच जागेवर उभी असेल "त्याने कुराणाकडे बोट दाखवून सांगीतले "हे सुंदर कुराण मी वाचू शकत नाही,परन्तू माझ्या गावाची मुले तरी लिहायला,वाचायला शिकतील. त्याकरिता मी वाट्टेल ती किंमत मोजायला तयार आहे. "खरच तो अडाणी माणूस सर्वात शहाणा होता

सेन्ट्रल एशिया इन्स्टिटयूट चा संचालक म्हणून ग्रेगला, ईतर ठीकाणी सुद्धा शाळा बांधता येतील का याची पहाणि करण्याकरिता जावे लागे.अफगाणिस्तान आणी पाकिस्तान यांच्या सीमेवर असलेला वझीरीस्तान नावाच्या रानटी आणि अराजकीय प्रदेशात, ग्रेगला, सरवेक्षणा करीता जावे लागे.तेथे फसवून त्याचे अपहरण करण्यात आले. आठ दिवस बंदिवासात काढावे लागले. अमेरिकेत तारा गरोदर होती व तिच्या बाळंतपणाची वेळ जवळ आली होती. शेवटी ग्रेग हा शत्रू नसून, चांगल्याच हेतूने वझीरीस्तानात आला आहे याची वझीरांना खात्री पटल्यावर त्याला सोडण्यात आले.बंदिवासातून मोकळे करीतना त्याला खास मेजवानी देण्यात आली आणि त्याच्या शाळेच्या प्रकल्पाकरीता पैसे दान करण्यात आले. तारा व ग्रेगला तेरा सप्टेंबर 1996 साली कन्यारत्न झाले व तीचे अमीरा असे नाव ठेवण्यात आले. जीन हॉर्नी आता वयस्कर झाला होता व कर्करोगाने ग्रस्त होता.त्याने प्रायोजित केलेल्या शाळेचा प्रकल्प पूर्णत्वास गेलेला पाहण्याची त्याला घाई लागली होती. मरणापूर्वी पूर्ण बांधकाम झालेल्या शाळेचा फोटो आणण्याची विनंती जीनने ग्रेगला केली. थोडेच आठवडे आपल्या नवजात मुलीच्या व बाळंतीण पत्नीच्या सान्निध्यात राहून ग्रेग परत पाकिस्तानात कोर्फे गावी आला.10डिसेंबर 1996मध्ये कोर्फेची शाळा बांधून पूर्ण झाली. त्या पूर्णत्वास गेलेल्या शाळेचा फोटो काढून ग्रेग जीन हा॑र्नी कडे परतला. जीन मृत्युशय्येवर होता.ग्रेग ने त्याला फोटो दाखविल्या वर,जीनने तो फोटो आपल्या पलंगाच्या समोर भिंतीवर लावला. 12 जानेवारी 1997 रोजी जीन हा॑र्नी, एक दूरदर्शी शास्त्रज्ञ व सेमिकंडक्टर उद्योगाचा जनक, मरण पावला.

क्रमशः

Read Past Issues मागील अंक वाचा